**पश्चिम घाट विकास कार्यक्रमाबाबत मार्गदर्शक सूचना...**

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : पघावि-२०११/प्र.क्र.४५/का.१४८३
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ५ जुलै, २०११.

**प्रस्तावना :-**

देशातील डोंगराळ प्रदेशाच्या विकासास चालना देण्यासाठी राष्ट्रीय विकास मंडळाच्या शिफारशीनुसार १९७४-७५ या वर्षापासून महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ व गोवा या राज्यांमध्ये पश्चिम घाट विकासाचा केंद्र पुरस्कृत कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. या कार्यक्रमामधील एकुण क्षेत्रापैकी महाराष्ट्रातील ७०.२% क्षेत्रफळाचा समावेश असून राज्यातील ८६.७% लोकसंख्या आहे. या कार्यक्रमास केंद्र शासनाकडून ९०% अनुदान उपलब्ध होते व १०% रक्कम राज्य शासनाकडून उभारण्यात येते. ज्या तालुक्यातील किमान २०% क्षेत्र हे ६०० मीटर उंचीवर किंवा त्यापेक्षा जास्त उंचीवर आहे अशा क्षेत्राचा पश्चिम घाट क्षेत्रात समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुसार या कार्यक्रमात १२ जिल्हयांतील ६३ तालुक्यांचा समावेश होतो. कार्यक्रमांतर्गत समाविष्ट होणारे तालुके व जिल्हे याची यादी प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविण्यात आली आहे.

योजना आयोगाने नियुक्त केलेल्या क्षेत्रीय उप गटाच्या ( एरिया सब ग्रुप) मार्गदर्शक सूचनांनुसार पश्चिम घाट विकास कार्यक्रमाची खालीलप्रमाणे प्रमुख उद्दिष्टे ठरविण्यात आली आहेत :-

1. पश्चिम घाट क्षेत्रातील नैसर्गिक वैशिष्टये जतन करण्यासाठी पर्यावरण परिस्थितीवर समतोल राखणे.
2. या क्षेत्रातील अनुवांशिक विविधता जतन करणे.
3. मानवी कृतीमुळे पर्यावरण परिस्थितीत पोहोचलेली हानी दूर करुन पर्यावरण पूर्ववत करणे.
4. पर्यावरणाच्या हानीमुळे होणा-या संभाव्य परिणामांची लोकांना जाणीव करुन देणे व त्याबाबत त्यांना प्रशिक्षण देणे आणि पर्यावरण विषयक विकास कार्यक्रमांमध्ये त्यांचा सक्रीय सहभाग मिळविणे.

पश्चिम घाट विकास कार्यक्रमाशी संबंधित योजना आयोगाचे वेळोवेळीचे निदेश, राष्ट्रीय विकास परिषदांच्या आढावा बैठकीतील सूचना तसेच विविध समित्या, मंडळांच्या सूचना व इतर राज्यातील कार्यप्रणाली लक्षात घेऊन सविस्तर मार्गदर्शक सूचना विहित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्याप्रमाणे मार्गदर्शक सूचना विहित करण्यात येत आहेत.

**शासन निर्णय :-**

**(अ) आराखडा तयार करुन योजना आयोगास सादर करणे :-**

पश्चिम घाट विकास कार्यक्रमाची उपरोक्त उद्दिष्टे लक्षात घेऊन विविध प्रशासकीय विभाग/ यंत्रणांमार्फत प्रस्ताव नियोजन विभागामार्फत आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला मागविण्यात येतील. या संबंधित/ यंत्रणांनी कार्यक्रमासाठी प्रस्ताव तयार करताना खालील बाबी लक्षात घ्याव्यात :-

१) विविध लोकोपयोगी विकास कामांतून पर्यावरण संबंधित सामाजिक, आर्थिक विकास हा मूळ उद्देश असला पाहिजे.

२) पश्चिम घाट विकास कार्यक्रमाच्या सर्व समाविष्ट तालुक्यांना समाविष्ट करुन घेण्याबाबत प्रयत्न करावे. विकास कार्यक्रम घेताना प्रादेशिक समतोल राखला जाईल याची काळजी घ्यावी.

३) पश्चिम घाट विकास क्षेत्रात येणाऱ्या लोकांच्या आशा-आकांक्षा केंद्रस्थानी ठेऊन स्थानिक व नैसर्गिक परिस्थिती लक्षात ठेऊन कार्यक्रमाची आखणी केली जावी. लोकांच्या उपजीविकेशी निगडित उत्पन्न वाढविणाऱ्या योजनांना प्राधान्य द्यावे तसेच सामाजिक समतोल राखला जाईल याची काळजी घ्यावी.

४) उपरोक्तप्रमाणे तयार केलेले प्रस्ताव संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी प्रशासकीय मान्यतेनंतर नियोजन विभागास सादर करावेत.

५) नियोजन विभाग या प्रस्तावास पश्चिम घाट विकास कार्यक्रमाचे मूळ उद्दिष्ट व व्यापक विचारांती अंतिम मान्यता देऊन सदर प्रस्ताव योजना आयोग, नवी दिल्ली यांचेकडे मान्यतेसाठी सादर करेल.

**ब) <u>योजनेची अंमलबजावणी</u> :-**

१) आराखडा मंजूरीबाबत शासनाने कळविल्यानंतर या अंतर्गत मंजूर कार्यक्रमांचे आदेश विभागांनी/यंत्रणांनी आवश्यकतेनुसार तात्काळ काढावेत व क्षेत्रीय यंत्रणांना निधी उपलब्ध करुन द्यावा.

२) शासनाने वितरित केलेला निधी विभागांनी/यंत्रणांनी अंमलबजावणी करणाऱ्या क्षेत्रीय कार्यालयांना १० दिवसात वितरित करावा.

३) मंजूर कामांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणाऱ्या क्षेत्रीय यंत्रणांवर संनियंत्रण विभागांनी ठेवावे. यासाठी दरमहा/त्रैमासिक/वार्षिक मुल्यमापनाचे विवरणपत्र तयार करण्यात यावे. शासनास सोबत जोडलेल्या विवरणपत्रात माहिती प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत प्राप्त होईल या बेताने पाठवावी.

४) प्रत्यक्ष कामांचा आढावा संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांनी वेळोवेळी घ्यावा. आढावासाठीच्या उच्चस्तरीय समितीत नियोजन विभागाच्या प्रतिनिधींचा समावेश असावा. कामांची प्रगती लक्षात ठेऊन पुढील टप्प्याचे निधी वितरणाचे आदेश काढण्यात यावेत.

५) केंद्र शासनास त्रैमासिक प्रगती अहवाल पाठविण्याकरिता १५ जुलै, १५ ऑक्टोबर, १५ जानेवारी व १५ एप्रिलपर्यंत अहवाल नियोजन विभागास पाठविण्यात यावेत.

६) आवश्यकतेनुसार त्रैमासिक आढावा बैठका नियोजन विभागाने वेळोवेळी आयोजित कराव्यात.

**(क) <u>योजनेचे मुल्यमापन</u> :-**

(१) योजनेचे योग्य व समयोचित संनियंत्रण व मुल्यमापन आवश्यक आहे. यासाठी मंजूर कर्मचाऱ्यांना अनुरुप संनियंत्रित करावयाच्या बाबी नमूद करण्यात याव्यात. यातील मासिक/त्रैमासिक/सहामाही/वार्षिक यानुसार बाबींचे वर्गीकरण करुन, त्याप्रमाणे त्यांचे प्रगती अहवाल प्राप्त करुन घ्यावेत.

(२) पश्चिम घाट विकास कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी तसेच क्षेत्रातील स्थानिक जनतेचा पर्यावरणाचा ऱ्हास न होता आर्थिक विकास होऊन मानवी विकास निर्देशांक वाढावा हा उद्देश आहे. आर्थिक उद्दिष्टांव्यतिरिक्त भौतिक उद्दिष्ट प्राप्तीचे संनियंत्रण व मुल्यमापन करण्याकरिता महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर यांचाही सहभाग योग्य त्या कार्यासाठी करण्यात यावा.

(३) प्रत्यक्ष काम जेथे सुरु असेल तेथून गोळा केलेली माहिती ही दर्जेदार असल्याने ती कमीत कमी वेळेत मुल्यमापन करणाऱ्या अधिकाऱ्यांकडे पोहोचेल यासाठी प्रभावी ऑनलाईन मुल्यमापन यंत्रणा उभी करावी. माहितीचे वेळेत मुल्यमापन न झाल्यास योजनांचे दोष दूर करणे व यशस्वी प्रयोग इतर क्षेत्रात राबविणे अशक्य झाल्याने, यशस्वी व प्रभावी उद्दिष्टप्राप्ती प्राप्त होऊ शकत नाही. ऑनलाईन संगणकीकृत माहिती संकलन यंत्रणेमुळे सहजशक्य असल्याने, यासाठी विशेष प्रयत्न करावे व निधीची तरतूद करावी.

**(१)** पघाविका कार्यक्रमांच्या आढाव्याबाबत मंत्रालयीन स्तरावर खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे :-

| | |
|---|---|
| १) प्रधान सचिव, नियोजन व विकास आयुक्त | अध्यक्ष |
| २) आराखड्यात निवडलेल्या योजनांची संबंधित विभागांचे प्रधान सचिव/ सचिव | सदस्य |
| ३) सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय | सदस्य |
| ४) सह सचिव, नियोजन विभाग (का.१४८३) | सदस्य सचिव |

सदर समिती **दर तीन महिन्यांनी** कार्यक्रमांचा आढावा घेईल व त्याप्रमाणे सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना सुचवेल.

**(२)** किमान सामायिक कार्यक्रम २००८ अन्वये निवडण्यात आलेल्या पाणलोटांच्या उपचाराकरिता शासनातर्फे निधी वितरित करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाची अंमलबजावणी संचालक, मृद संधारण व एकात्मिक पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, संचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय व वन विभागामार्फत होत आहे. यांचे समन्वयक म्हणून संचालक, मृद संधारण व एकात्मिक पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन हे कामकाज पाहत आहेत. तथापि, मंत्रालयीन स्तरावरुन या कार्यक्रमाची पर्यवेक्षण करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपसमिती गठित करण्यात येत आहे :-

| | |
|---|---|
| १) सह सचिव, नियोजन विभाग (का.१४८३) | अध्यक्ष |
| २) सह संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे | सदस्य |
| ३) मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक), पुणे यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४) सह संचालक, मृद संधारण व एकात्मिक पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन | सदस्य सचिव |

उपरोक्त उपसमिती **दर दोन महिन्यांनी** कार्यक्रमाचा आढावा घेईल व त्याप्रमाणे सुधारणा सुचवून प्रभावी अंमलबजावणी घडवून आणण्याच्या दृष्टीने कार्यवाही करेल.

**(ड) योजनेच्या वित्त व लेखा विषयक बाबी :-**

पघाविका अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचा विहित केलेल्या कामांवर खर्च करण्यात यावा व बॉम्बे फायनाशियल रुल्स, १९६९ व महाराष्ट्र अर्थसंकल्पिय नियम पुस्तिका अन्वये दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे. खर्चाचे विहित वेळापत्रकानुसार खर्चमेळाचे कामकाज महालेखापालांमार्फत करुन घ्यावे व त्याबाबतच्या तफावती दूर करण्याबाबत नियंत्रक अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी. उपलब्ध करुन

## पश्चिम घाट विकास कार्यक्रमांतर्गत समाविष्ट होणारे तालुके व जिल्हे

### प्रपत्र-अ

| अ.क्र. | जिल्हा | तालुका |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | ठाणे | १) मोखाडा २) वाडा, ३) शहापूर ४) मुरबाड ५) जव्हार |
| २ | रायगड | १) कर्जत २) खालापूर ३) सुधागड-पाली ४) रोहा ५) माणगांव ६) महाड ७) पोलादपूर |
| ३ | रत्नागिरी | १) खेड २) चिपळूण ३) संगमेश्वर ४) लांजा ५) राजापूर |
| ४ | सिंधुदूर्ग | १) कणकवली २)सावंतवाडी ३)देवगड ४) कुडाळ ५) वैभववाडी |
| ५ | नाशिक | १) इगतपुरी २) नाशिक ३) दिंडोरी ४) पेठ ५) कळवण ६) सुरगाणा ७) सटाणा, ८) सिन्नर ९) त्र्यंबकेश्वर |
| ६ | धुळे | १) साक्री |
| ७ | नंदुरबार | १) नवापूर |
| ८ | अहमदनगर | १) अकोला २) संगमनेर |
| ९ | पुणे | १) जुन्नर २) आंबेगाव ३) खेड ४) मावळ ५) हवेली ६) मुळशी ७) वेल्हे ८) भोर ९) पुरंदर |
| १० | सातारा | १) सातारा २) वाई ३) पाटण ४) जावळी ५) महाबळेश्वर ६) खटाव ७) खंडाळा ८) कोरेगांव |
| ११ | सांगली | १) शिराळा |
| १२ | कोल्हापूर | १) शाहुवाडी २) पन्हाळा ३) करवीर ४) गगनबावडा ५) राधानगरी ६) कांगल ७) भुदरगड ८) आजरा ९) गडहिंग्लज १०) चंदगड |
| एकूण | १२ जिल्हे | ६३ तालुके |

केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय पुढील हप्ता वितरित करण्यात येणार नाही. उपयोगिता प्रमाणपत्र सादर करताना संबंधित विभाग प्रमुखांनी योग्य ती तपासणी करावी. मात्र कुठल्याही परिस्थितीत यंत्रणांनी नियोजन विभागाच्या पूर्वसहमतीशिवाय वेतन अथवा इतर कुठल्याही अनुज्ञेय नसलेल्या बाबींवरील खर्च या निधीतून भागवू नये. असे केल्यास ती वित्तीय अनियमितता समजण्यात येईल व याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची राहील.

(९) विधीमंडळ, न्यायालये, लोक आयुक्त इ.शी संबंधित बाबी विधीमंडळाचे प्रश्न, चर्चा, सूचना इ.बाबत कार्यवाही खालीलप्रमाणे करावी :-

१) योजनेची उद्दिष्टे, मार्गदर्शक सूचना, निधी वितरण, अंतिम मुल्यमापन व केंद्रीय योजना आयोगाशी संबंधित सर्व बाबींबाबत विषय नियोजन विभागामार्फत हाताळले जातील.

२) योजनेची अंमलबजावणी क्षेत्रीय यंत्रणांना निधी वितरण व कार्यक्रम राबवितांना होणारे गैरप्रकार, तांत्रिक बाबी इ.विषय संबंधित यंत्रणांच्या प्रशासकीय विभागामार्फत हाताळण्यात येतील.

(१०) सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी जारी केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने तसेच ई-गव्हर्नन्स प्रणाली अमलात आणण्याच्या दिशेने शासनामार्फत करण्यात येणारा सर्व स्मरणपत्रे तसेच बैठकीच्या सूचना व अत्यावश्यक व तातडीच्या प्रकरणांबाबत माहिती **Planing_PRG_DO1483@maharashtra.gov.in** या ईमेल आयडीवरुन मागविण्यात/देण्यात येईल. यासंबंधी पुन्हा नव्याने पत्रव्यवहार करण्याची आवश्यकता असणार नाही. ई-मेल वरुन देण्यात आलेल्या सूचना हया पुरेशा असतील. यासंबंधीची नोंद सर्व यंत्रणांनी घ्यावी.

(११) उपरोक्त परिच्छेदात नमूद न केलेल्या सर्व विवक्षित बाबींबाबत नियोजन विभागाचे अभिप्राय अंतिम असतील.

(१२) हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन सदर शासन निर्णयाचा सांकेतांक **२०११०७०५१४५५०००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( अ. कृ. जगताप )
शासनाचे सह सचिव

**प्रति,**

(१) सर्व मंत्रालयीन अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
(२) प्रधान सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली.
(३) आयुक्त, कृषी आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजी नगर, पुणे-५.
(४) संचालक, मृद संधारण व एकात्मिक पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, मध्यवर्ती इमारत, पुणे-१.
(५) मुख्य कार्यकारी अधिकारी, खादी व ग्रामोद्योग मंडळ, मनोहरदास स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-१.
(६) मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक), पुणे वन वृत्त, जुनी पी.एम.टी.इमारत, स्वारगेट, पुणे-
(७) संचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे-१.
(८) आयुक्त, मत्स्यव्यवसाय, तारापोरवाला म्युझियम, गिरगांव, मुंबई.
(९) व्यवस्थापकीय संचालक, अपारंपारिक ऊर्जा (मेडा), येरवडा, पुणे.
(१०) अधीक्षक अभियंता, नवी मुंबई, रायगड विशेष प्रकल्प मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई.

C:\Documents and Settings\admin\Desktop\wgdp guidelines GR(1).wp